# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 24/06/2020 (बुधवार)
(दुपार)

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

दिनांक 23/06/2020 रोजी पो.स्टे. केळवदचा स्टाफ नाईट पेट्रालिंग करीत असतांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे रोडनी एमएच–15/ईजी–9319 क्रमांकाची अशोक लेलॅन्ड दोस्त गाडी मध्ये अवैध्यरीत्या कतलीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशा खबरे वरुन पो.स्टे. केळवद स्टाफ पांढुर्णा रोड हायवे क्र. 47 वरील बिहाडा फाट्यावर नाकाबंदी लावून वाहन तपासात असतांना दिनांक 23/06/2020 चे 21:15 वा. दरम्यान एक एमएच–15/ईजी–9319 क्रमांकाची अशोक लेलॅन्ड दोस्त गाडी भरधाव वेगाने येतांना दिसले. वाहन चालकास थांबविण्याचा ईशारा दिला असता त्याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन नागपूरच्या दिशेने पळवुन नेले. पोलिसांना त्या वाहनाबाबत संशय आल्याने वाहनाचा पाठलाग करीत असतांना चालकाने त्याच्या ताब्यातील गाडी भरधाव वेगाने पळवुन तेलंगखेडी गावा जवळ असलेल्या कॅनलजवळील रोडच्या टर्निंगमध्ये वाहन रोडचे खाली उतरून पलटी झाले. पोलिस स्टाफच्या मदतीने पाहणी केली असता सदर वाहनात गाडी मालक आरोपी नामे क्र.1) मोहम्मद जमिल अब्दुल रहिम, वय 38 वर्ष, रा. गड्डीगोदाम पोलीस चौकी जवळ नागपूर याच्या ताब्यातुन 06 गाई गौवंश जनावरे अत्यंत क्रुर व निर्दयतेने पाय व तोंड दोरीने बांधुन दिसले. सदरचे जनावरे ही कत्तलीसाठी वाहनात भरुन घेवुन जात होते. तर एमएच–15/ईजी–9319 क्रमांकाची अशोक लेलॅन्ड दोस्त गाडीचा चालक आरोपी क्र. 2) मोहम्मद बारक्या अब्दुल रहिम हा अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेला. आरोपीच्या ताब्यातुन एकुण 06 नग गाई गौवंश किमती 60,000/– रु., एक एमएच–15/ईजी–9319 क्रमांकाची अशोक लेलॅन्ड दोस्त गाडी किमती 5,00,000/–रुपये असा एकुण कि. 5,60,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन केळवद अप क्र. 154/2020 कलम 279, 34 भादवी सहकलम 11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. 1960 सह कलम 5 (अ), 9 महा. सरंक्षण अधिनीयम 1965, सहकलम 119 महा पोलीस अधिनियम, सहकलम 179, 184, 134/177, 192(अ) मो वा का 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास पोउपनि श्री अर्जुन राठोड हे करीत अहेत.

सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सपोनि श्री सुरेश मट्टामी, पोउपनि श्री अर्जुन राठोड, पोहवा अमर झिने, चानापोशि गुणेश्वर डाखोळे, होमगार्ड सैनीक विजय वडकी, नानुसाव राऊत, देवेन्द्र वडकी यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर